**<u>विशेष मुकदमा नं. ५७९/२०११ मधील नि.   वरील आदेश</u>**
**<u>दिनांक ०३/०३/२०२३ रोजी दाखल केलेला अर्ज</u>**

०१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१० भिमा हिरा पाटील हया दिनांक १९/०१/२०२३ रोजी मयत झाल्यामुळे त्यांचे नाव दि.प्र.सं.क्र.१ नियम १० प्रमाणे वगळण्यासाठी दाखल केला आहे.

०२. वादी यांचे थोडक्यात म्हणणे असे की, श्रीमती भिमा हिरा पाटील हया दिनांक १९/०१/२०२३ रोजी मयत झालेल्या असून त्यांचे वारस प्रतिवादी क्र.८ व ९ हे आहेत. सदर अर्ज मुदतीत दाखल केलेला आहे. अर्जासोबत प्रतिज्ञापत्र व भिमाबाई हिरा पाटील यांच्या मृत्यूच्या दाखल्याची साक्षांकित प्रत देखील सोबत जोडलेली आहे.

०३. सदर अर्जास प्रतिवादीने हरकत घेतलेली नाही. सदर अभिलेखाचे व कायदयाचे तरतुदीचे अवलोकन केले असता तसेच युक्तिवाद ऐकला असता अर्ज मंजूर करणे न्यायाचे आहे. सबब, मी खालील आदेश पारीत करते—

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. सदर वादी यांनी प्रतिवादी क्र.१० भिमा हिरा पाटील यांचे नाव दाव्यातून वगळून त्याप्रमाणे दुरुस्ती करावी व दुरुस्त प्रत अभिलेखावर दाखल करावी.

AVANI ASHWIN GODSE
Digitally signed by AVANI ASHWIN GODSE
Date: 2023.04.06 13:53:12 +0530

पनवेल (अ.अ. गोडसे)
दिनांक ०६/०४/२०२३ २रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, पनवेल